जावक क्रमांक -३१८ /२०१८.
वाकड पोलीस स्टेशन पुणे.
दिनांक - १२/०१/२०१८.

प्रति,
मा. सहाय्यक पोलीस आयुक्त सो,
तथा
जनसंपर्क अधिकारी,
पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर.
यांना सविनय सादर

विषय - दाखल गुन्हयातील अनोळखी मयत इसमाचे व त्याचे वारसांचे तपासकामी स्थानिक वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्दी होणेबाबत

महोदय,

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर करण्यात येते की, वाकड पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ४८/२०१७ भा.दं.वि. कलम ३०२ मधील फिर्यादी नामे श्रीराम शंकर नखाते वय ६१ वर्षे, धंदा सेवानिवृत्त, रा. यशोदा माऊली निवास, बळीराज कॉलनी, रामनगर, रहाटणी पुणे यांचे मालकीचे सर्व्हे नं. ५५/२, निर्झरा पार्क सोसायटीजवळ रहाटणी पुणे येथील जागेत दि. २४/०१/२०१७ रोजी सकाळी १०-०० वा. चे अगोदर एक इसम जखमी अवस्थेत पडल्याची माहिती समजल्याने, सदर ठिकाणी जाऊन पाहिले असता त्यांना सदर ठिकाणी अंदाजे ३० वर्षे वयाचा एक इसम पडलेला, त्याचे डोके फुटलेले, मानेजवळ, कपाळावर मोठमोठया जखमा झालेल्या व त्याचे डोक्याजवळ फरशीचे तुकडे रक्ताने माखलेले दिसल्याने त्यांची सदर जखमी इसमास कोणीतरी अज्ञात इसमांनी अज्ञात कारणावरुन, फरशीच्या तुकडयाचे सहाय्याने व अज्ञात हत्याराने जिवे ठार मारल्याची खात्री झाली म्हणुन फिर्याद दिल्याने वरील प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

**दाखल गुन्हयातील मयताचे वर्णन खालीलप्रमाणे -**

एक अनोळखी पुरुष, वय अंदाजे ३० वर्ष, त्याची उंची अंदाजे ५ फुट ४ इंच, रंगाने सावळा, चेहरा गोल, मध्यम शरीरबांधा, केस कुरळे, नेसणीस राखाडी रंगाची पॅन्ट व त्याचे आतमध्ये निळया रंगाची जीन्स पॅन्ट, अंगात दोन शर्ट पैकी वरचा चौकटी पिवळया व लाल रंगाच्या पट्टया असलेला निळा शर्ट व त्याचे आतमध्ये पांढरा शर्ट, त्याचे डावे हातामध्ये पांढ-या धातुची साखळी, गळयामध्ये काळे रंगाचा दोरा व कमरेस सप्तरंगी दोरा, **उजवे हाताचे पोटरीवर " श्रीमंत सिताबाई " व छातीवर " संगिता "** असे मराठीमध्ये गोंदलेले आहे.

येणेप्रमाणे सोबतचे फोटोतील वर्णनाचे मयत इसमाची अद्याप ओळख पटलेली नसल्याने मयत इसमाचा व त्याचे वारसांचा तपास होणेकामी पुन्हा स्थानिक वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्दी होणेस विनंती आहे.